गाव तिथे प्रतिनिधी
नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
वर्ष १ ले ● अंक १२४ वा ● गुरुवार २१ सप्टेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 124 | Date : 21/09/2023 | blow : Thursday | Page 4 | Price 4

# महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मंजूर



नवी दिल्ली : देशभरात गेल्या दोन दिवसांपासून ज्याची चर्चा सुरू आहे ते महिला आरक्षण विधेयक लोकसभेत पारित करण्यात आलं आहे. लोकसभा आणि देशातल्या सर्व राज्यांमधील विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षणाच्या बहुप्रतीक्षित विधेयकाला सोमवारी (१८ सप्टेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यानंतर मंगळवारी पतंप्रधान नरेंद्र मोदी आणि सर्व खासदारांनी नव्या संसदेत प्रवेश केला. नव्या संसदेतील पहिल्याच भाषणावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे विधेयक लोकसभेच्या पटलावर ठेवलं. यावर दोन दिवस सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी चर्चा केली. कोणत्याही प्रमुख पक्षाने या विधेयकाला विरोध केला नाही. परंतु विरोधी पक्षांनी याची अंमलबजावणी लवकर व्हावी, तसेच यात ओबीसींचा समावेश व्हावा अशा मागण्या केल्या.

दरम्यान, महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मंजूर झालं आहे. आता राज्यसभेत मोदी सरकारची खरी परिक्षा असणार आहे. कारण राज्यसभेत मोदी सरकारकडे बहुमत नाही. परंतु, हे विधेयक पारित होण्यात अडचण येणार नाही असं चित्र दिसतंय. कारण या विधेयकाला देशभरातून समर्थन मिळत आहे आणि कुठल्याही मोठ्या पक्षाने या विधेयकाला विरोध केला नाही.

लोकसभेत बुधवारी (२० सप्टेंबर) सायंकाळी ७ वाजता या विधेयकावर मतदान घेण्यात आलं. यावेळी लोकसभेतील ४५४ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केलं. तर केवळ दोन खासदारांनी या आरक्षण विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. मतदानावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत उपस्थित होते. दरम्यान, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी हे विधेयक लोकसभेत पारित करण्यात आल्याची घोषणा केली.

मतमोजणीनंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले, एकूण ४५४ सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूने मतदान केलं आहे. तर दोन सदस्यांनी विरोधात मतदान केलं आहे. सभागृहातील एकूण सदस्यसंख्या । पान २ वर

## प्रत्यक्ष कर संकलनात मोठी वाढ, सरकारच्या तिजोरीत भर

नवी दिल्ली : देशातील प्रत्यक्ष कर संकलनात (direct tax collection) मोठी वाढ झाली आहे. त्यामुळं सरकारच्या तिजोरीत मोठी भर पडली आहे. १ एप्रिल २०२३ ते १६ सप्टेंबर २०२३ पर्यंत देशाचे प्रत्यक्ष कर संकलन २३.५ टक्क्यांनी वाढून ८.६५ लाख कोटी रुपये झाले आहे. तर आगाऊ कर संकलनही २०.७ टक्क्यांनी वाढून ३ लाख ५५ हजार ४८१ कोटी रुपये झाले आहे.




प्रत्यक्ष कर संकलनामध्ये ४.१६ लाख कोटी रुपयांचा कॉर्पोरेशन कर आणि ४.४७ लाख कोटी रुपयांचा वैयक्तिक आयकर देखील समाविष्ट आहे. ज्यामध्ये सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (STT) समाविष्ट आहे. एकंदर जमा झालेल्या ८ लाख ६५ हजार १७७ कोटी रुपयांच्या निव्वळ प्रत्यक्ष कर संकलनात कंपनी प्राप्तिकर ४,१६, २१७ कोटी रुपये आणि वैयक्तिक प्राप्तिकरासह, रोखे उलाढाल कराच्या (एसटीटी) रुपाने ४४७२९१ कोटी रुपये । पान २ वर

## राज्यातील सर्व दिव्यांगासाठी लवकरच स्वतंत्र घरकुल योजना सुरू होणार

### दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष बच्चू कडू



**✻ सर्व दिव्यांगांनी सकारात्मक रहावे, शासन खंबीरपणे पाठीशी आहे ✻ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नातून तीन दिवसात दिव्यांग मंत्रालयाची स्थापना, दिव्यांगासाठी स्वतंत्र विभाग असणारे महाराष्ट्र राज्य जगात एकमेव. ✻ सोलापूर जिल्हा प्रशासन दिव्यांगासाठी संवेदनशील असून जास्तीत जास्त दिव्यांगाना शासकीय लाभ देण्यासाठी प्रयत्नशील असल्याबद्दल श्री. कडू यांच्याकडून प्रशासनाचे कौतुक. ✻ दिव्यांगाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध ✻शासन दिव्यांगाच्या दारी या जिल्हास्तरीय अभियानाचे श्री बच्चू कडू यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून उद्घाटन**

सोलापूर/प्रतिनिधीः जागतिक स्तरावर तीन डिसेंबर रोजी जागतिक अपंग दिन साजरा केला जातो. राज्य शासनाने मागील वर्षी ३ डिसेंबर रोजी दिव्यांगासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन केले. या विभागाच्या वतीने राज्यातील दिव्यांगाना विविध शासकीय योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. याच अनुषंगाने दिव्यांगासाठी स्वतंत्र घरकुल योजना राज्य शासनाने राबवावी अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली असून ती लवकरच पूर्ण होईल, असे प्रतिपादन दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष व मार्गदर्शक । पान २ वर

## 'आत्मनिर्भर भारताची निर्मिती नारी शक्तीशिवाय शक्य नाही'

### महिला आरक्षणावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांची प्रतिक्रिया



नवी दिल्ली : केंद्र सरकारकडून लोकसभेत मंगळवार (१९ सप्टेंबर) रोजी महिला आरक्षणाचे विधेयक मांडण्यात आले आहे. या आरक्षणावरुन राजकीय वर्तुळात अनेक दावे प्रतिदावे करण्यात येत आहेत. केंद्रिय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील महिला आरक्षण विधेयकावर प्रतिक्रिया दिली आहे. संसदेत हे विधेयक मांडल्यानंतर त्यांनी म्हटलं की, 'हा एक असा निर्णय आहे ज्यामुळे महिलांना त्यांचे अधिकार मिळतील.' तर अमित शाह यांनी या निर्णयासाठी पंतप्रधान मोदींचे आभार मानले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ट्वीट करत देखील प्रतिक्रिया दिली. ट्वीट करत त्यांनी म्हटलं आहे की, 'पंतप्रधान मोदी यांनी मंगळवार (१९ सप्टेंबर) रोजी भारताच्या सनातन संस्कृतीला अनुसरुन 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमंते तत्र देवता' हे देशाच्या लोकशाहीत लागू केले आहे. लोकसभेत मांडण्यात आलेले महिला आरक्षण विधेयक त्याचाच एक भाग आहे. यामुळे आपल्या देशातील नारी शक्तीला त्यांचे योग्य अधिकार मिळणार आहेत. पुढे बोलताना अमित शाह यांनी म्हटलं की, 'महिला नेतृत्व सक्षमीकरण' ही केवळ सरकारची घोषणा नाही, तर एक संकल्प आहे. तर देशातील महिला शक्तीला अधिकार देण्याचा मोदी सरकारचा हा निर्णय आगामी काळात विकसित आणि समृद्ध भारताच्या उभारणीचा मुख्य आधारस्तंभ बनेल. 'धोरण असो की नेतृत्व, भारताच्या स्त्री शक्तीने हे सिद्ध केले आहे की त्या कोणत्याही क्षेत्रात कोणापेक्षा कमी नाहीत. मोदी सरकारचा असा विश्वास आहे की नारी शक्तीच्या पाठिंब्याशिवाय आत्मनिर्भर भारताची निर्मिती शक्य नाही', असं अमित शाह म्हणाले.मंगळवारी (१९ सप्टेंबर) रोजी संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी महिला आरक्षण विधेयक (नारी शक्ती वंदन कायदा) संसदेत मांडले.

## तूर खरेदी करून मार्केट यार्डातील व्यापाऱ्यांची दीड कोटींची फसवणूक

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट यार्ड) मधील विविध व्यापाऱ्यांकडून तूर खरेदी करून त्याचे पैसे न देता एकूण एक कोटी ५६ लाख ९१ हजार २०४ रुपयांची फसवणूक करून शहरातून निघून गेल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी सोमनाथ परमेश्वर चरे (वय३८, रा. कक्कया नगर, चौडेश्वरी पतसंस्था शेजारी, शेळगी) याच्याविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. मनोज अरुण धरणे (वय ४३, रा.योगिनाथ हाऊसिंग सोसायटी, शेळगी) यांनी फिर्याद दिली आहे. याबाबतची माहिती अशी की, जुलै ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील फिर्यादीसह साई श्रद्धा, सन ट्रेडर्स, फुलचंद ट्रेडर्स, समर्थ ट्रेडर्स, सानवी ट्रेडर्स, प्रणव ट्रेडर्स आदी व्यापाऱ्यांचा विश्वास संपादन करून आरोपीने बाजारभावापेक्षा जास्त भाव देतो असे प्रलोभन दाखवून शेकडो क्विंटल तूर खरेदी केली. या तुरीची एकूण रक्कम एक कोटी ५६ लाख ९१ हजार २०४ रुपये अशी आहे. या खरेदी केलेल्या तुरीची रक्कम व्यापाऱ्यांनी विचारली असता आरोपीने फोन बंद करून शहरातून निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आह

## हा ओबीसी समाजाचा अपमान आहे, थेट आकडेवारी सादर करत राहुल गांधींचा मोदी सरकारवर हल्लाबोल




नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी लोकसभेत महिला आरक्षण विधेयक मांडलं. या विधेयकावर आज लोकसभेत चर्चा केली जात आहे. दरम्यान, सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांकडून आपापली भूमिका मांडली जात आहे. यावेळी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनीही महिला आरक्षण विधेयकावर आपली भूमिका स्पष्ट केली. महिला आरक्षण विधेयक लवकरात लवकर मंजूर करून ते लागू करावं, अशी मागणी राहुल गांधींनी केली. ओबीसी समाजाची देशातील सत्तेत असलेल्या अल्प भागीदारीवरून राहुल गांधींनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. लोकसभेत राहुल गांधी म्हणाले, भारतात एकूण ९० सचिव आहेत. जे भारताचं सरकार चालवतात आणि अर्थसंकल्प नियंत्रित करतात. त्यामध्ये ओबीसी समुदायाचे लोक किती आहेत? । पान २ वर

## दहशतवाद्याच्या हत्येनं भारत कॅनडात तणाव; कॅनडालाही फटका बसणार



नवी दिल्ली : दिल्लीत जी-२० समुहाची बैठक पार पडली. त्याच बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जस्टिन ट्रुडो यांच्यात एक विषेश बैठक पार पडली, या बैठकीत दोन्ही नेत्यांनी खलिस्तान्यांवरच चर्चा केली. त्याच बैठकीचा उल्लेख करत भारतातून कॅनडात परतल्याच्या तिसऱ्या दिवशीच कॅनडाचे पंतप्रधान ट्रुडोंनी भारतावर गंभीर आरोप केले आणि संपूर्म जगभरात खळबळ माजली. भारतानं कॅनडाचे सर्व आरोप फेटाळून लावले असून कॅनडाच्या उच्चायुक्तांनीही देश सोडण्याचे आदेश दिले आहे. दरम्यान, कॅनडा आणि भारत यांच्यातील वाढत्या तणावामुळे व्यापारी जगतात चिंता वाढली आहे. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या । पान २ वर


# पालकांचे शाळेला अचानक भेट , जि.प. शाळेतील मुलांना बाराखडी येईना, याला जबाबदार कोण

## शिक्षकांनी चालवली विद्यार्थ्यांची थट्टा, अधिकारी हाकू लागले उंटावरून शेळ्या ?

**जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील शैक्षणिक दुरवस्थेचे भीषण वास्तव चव्हाट्यावर आणणारी धक्कादायक घटना अक्कलकोट तालुक्यात घडली आहे.चौथी,पाचवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला लिहिता-वाचताही येत नाही तर तो इथंपर्यंत गेलाच कसा,असा सवाल करत पालकानी शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल केली आहे.**

अक्कलकोट/विशेष प्रतिनीधीः विद्यार्थ्यांना शिक्षकाकडून मिळालेली ज्ञान म्हणजे गुरूचा प्रसाद आणि आशीर्वाद आहे.विद्यार्थी हे देशाचे भवितव्य असून विद्यार्थ्यांची प्रगती म्हणजेच देशाची प्रगती होय.विद्यार्थ्यांनी शिकून देशाची सेवा करतात. परंतु आजच्या मुलांना गणिताचे वजाबाकी आणि पाढे,वाचता,लिहिता येत नाही.मग शिक्षक शाळेत नेमक काय करतात ? शिक्षकांनी मुलांना शिक्षणाविना त्यांचे भवितव्य अंधारात ढकलत आहे?एक प्रकारे शिक्षकांनी विद्यार्थ्यांची थट्टा चालवलेली असतांना जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी उंटावर बसून शेळ्या का,हाकतात?पालकवर्गातुन चर्चेला ऊत येते आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा पाया शाळेतच रचला जातो, शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कार, मुल्यांच्या आधारावरच पुढील शिक्षणातील यश अवलंबून असते.शाळेत मिळणाऱ्या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असल्याने शालेय शिक्षणाचे महत्त्व आहे.परंतु जिल्हा परिषद मराठी शाळेत शिकणाऱ्या मुलांना किमान लिहिता वाचता यावं या संकल्पनेच वाटोळं करणारा एक धक्कादायक प्रकार समोर येत आहे.आपल्या पाल्याला लिहिता-वाचता येत नाही मग तो पुढच्या वर्गात पोहचलाच कसा?पालकानेच शिक्षण विभागाकडे तक्रार केल्याची निंदनीय घटना अक्कलकोट येथे घडली आहे.त्यामुळे शिक्षण क्षेत्रात मात्र खळबळ उडाली आहे.



शिक्षक विद्यार्थ्यांना दिवसभर शिकवत असतात, मुलांना एबीसीडी आणि बाराखडी न अडखळता वाचता येत नाही.मग स्पर्धेत मुले कसे टिकणार,स्पर्धेत टिकणारी पिढी घडवायची असेल तर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवायचे कसे हे प्रथम शिकले पाहिजे.स्वतः शिक्षकांना लिहिता वाचता येत नसेल तर विद्यार्थ्याला काय शिकवतील? स्वयंघोषित पुढारीपणा करण्यात आज शिक्षक वाढत आहे शिक्षणाच्या ज्ञान देण्यापेक्षा शैक्षणिक क्षेत्रात राजकीय स्पर्धा वाढत आहे ह्या शिक्षकांना शाळेला जाण्याचा वेळेची बंधन नसते.स्वतःला अधिकारी समजतो.त्यांच्या शाळेची तपासणी कधीच होत नसते. संबंधित अधिकाऱ्यांशी यांचे जिव्हाळ्याचे आर्थिक हितसंबंध जुळलेले असते.

तालुक्यात जिल्हा परिषदेची शाळांची संख्या, ज्या,त्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या, आणि किती शिक्षक कार्यरत आहेत.शिक्षक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्व शिक्षण देतो का?किंवा नाही,संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांची जबाबदारी आहे.परंतु त्यांना अपयश आल्याचे चर्चेतून ऐकू येते.शाळेची तपासणी कधीच होत नाही.गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षकांमध्ये आर्थिक हितसंबंध असल्याने सर्व काही ॲडजेस्टमेंट होत असल्याचे बोलले जाते?यामुळे येणाऱ्या नव्या पिढीचे जीवन उध्वस्त होणार हे नक्कीच.

जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांचा गटशिक्षणाधिकाऱ्यावर वचक हवे होते.तसे दिसत नाही?असेल तर विद्यार्थ्यांना वाचता,लिहिता का? येत नाही.वाईट परिस्थिती कशामुळे.विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात ढकलण्याचा पर्यत्न कोणी करतो? शिक्षणाधिकाऱ्यांनी उंटावरून शेळ्या?हाकण्या ऐवजी प्रत्यक्ष खाली उतरून बघावं.खरी परिस्थिती समजेल.

लाल फितीच्या गाडीत बसून स्वतःला मिरवून घेण्यापैक्षा,देशाचे भवित घडविणाऱ्या विद्यार्थ्याकडे लक्ष दिल्यास नक्कीच पुण्य मिळेल.असे पालकातुन बोलले जाते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

गुरुवार दि.२१ सप्टेंबर २०२३ 

## ✻ सुविचार ✻

नास्तिक मनुष्य हा आस्तिक मनुष्याइतकाच धार्मिक असतो.

## संपादकीय

### भारताचा आत्मविश्वास...

अलीकडे झालेली जी-२० शिखर परिषद म्हणजे चीनच्या वर्चस्वाला शह देतानाच अमेरिकेसोबतचे संबंध कायम ठेवून भारताने आपण जगातील कोणत्याही महाशक्तीला तोंड देण्यास सज्ज असल्याचे दाखवून दिले आहे. त्याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांतर्गत विरोधकांनाही चांगलीच धोबीपछाड दिल्याचे दिसून येते. जी-२० परिषदेच्या निमित्ताने 'इंडिया' का नको आणि 'भारत' का हवा या वादविवादात देशवासियांना गुंतवून ठेवण्याची भाजपची भूमिका एकीकडे यशस्वी झाली, तर दुसरीकडे जी-२० निमंत्रण पत्रिकेपासून ते लोगोवरही एक राजकीय पक्ष म्हणून भाजपने आपली छाप कायम ठेवली. 'एक तीर से दो निशाण' या उक्तीनुसार देशभरात दोन डझनहून अधिक राजकीय पक्षांच्या 'इंडिया' आघाडीलाही आपण एकटे टक्कर देऊ शकतो, हे दाखवण्याची ही नामी संधी पंतप्रधान मोदी यांनी दवडली नाही. देशात वर्षाखेर लोकसभा निवडणुका होतील असे संकेत आहेत. त्यातच 'एक देश, एक इलेक्शन'चे काम सुरू झाले आहे. त्यामुळे नजीकच्या काळात सार्वत्रिक निवडणुकीचा धुरळा उडणार हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या सर्व शक्यता लक्षात घेऊन जी-२० च्या व्यासपीठाचा वापर जणू 'एक देश, एक राजकीय पक्ष' या हेतूने प्रेरित होता असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. देशातील भाजप विरोधी आघाडीने 'इंडिया' हे नाव स्वीकारले आणि त्याला सहजपणे मिळणारी पसंती लक्षात घेऊन तातडीने 'इंडिया' वि. 'भारत' हा ब्लेम गेम सुरू झाला. त्यातच जी-२० च्या आयोजनाची उत्तम संधी पंतप्रधान मोदींना मिळाली. इव्हेंट, आभासी, लकाकती प्रतिमा, शो मॅन यात माहीर असणाऱ्या मोदी-अमित शहा या जोडगोळीने जी२० 'मोदी प्लस' कशी होईल याची पुरेपूर काळजी घेतली. अमेरिका, चीन, जपान व जर्मनी हे चार देश वगळता, जी -२० गटातील उर्वरित सर्व देशांपेक्षा भारताची अर्थव्यवस्था मोठी आहे. भारतावर राज्य केलेल्या सर्वच देशांना, केवळ अर्थव्यवस्थेच्या आकाराच्या बाबतीतच नव्हे, तर इतरही अनेक निकषांवर भारताने कधीच मागे सारले आहे. जी-२० परिषदेचा अध्यक्ष या नात्याने जगातील सर्वात शक्तिशाली नेत्यांचे यजमानत्व यशस्वी करणे, ही स्वातंत्र्योत्तर काळात नेत्रदीपक प्रगती केलेल्या भारतासाठी खचितच अभिमानाची बाब ठरली. एकोणिसावे शतक ब्रिटनचे, तर विसावे शतक अमेरिकेचे होते, असे मानले जाते. त्या धर्तीवर एकविसावे शतक हे आमचे असेल, असा ठाम आत्मविश्वास जी-२०च्या यशस्वी आयोजनामुळे भारताच्या ठायी निर्माण झाला आहे.

# काझीकणमूस मधील भीम नगर येथे साप्ताहिक बुद्ध वंदनाने होतोय समाज परिवर्तन

द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या शाखेच्या माध्यमातून घेत असलेल्या साप्ताहिक वंदना बद्दल लागलेली लोकांना उत्सुकता आपल्या भीम नगर मधून शाखेचा अध्यक्ष अमोल गायकवाड यांना काल शनिवारी सकाळपासून ते रविवारी सकाळी पर्यंत आपल्या समाजातील अनेक अगदी लहान मुलापासून ते वृद्ध लोकांपर्यंत प्रत्येकांचे फोन साप्ताहिक वंदना कधी आहे हे विचारण्यासाठी येतात साप्ताहिक वंदनाच्या कार्यक्रमाचा खर्च मी करतो तो करतो आम्ही करतो असं प्रत्येक जण म्हणत आहे ज्यावेळेस आपण निस्वार्थी भावनेने आणि सामाजिक बरोबर धार्मिक काम करत असतो त्यावेळेस आपल्याला समाजातील प्रत्येक व्यक्तींची साथ भेटत असते कोणी स्वतःच्या घरातला समाज मंदिर मध्ये प्रकाश पडावा यासाठी फोकस आणुन सहाय्यक करतोय तर दुसरा स्वतःकडे असलेले साहित्य कार्यक्रमाला आणून कार्यक्रमाची शोभा वाढवतो तर आपल्या समाजातील एक महिला आपल्या पतीबरोबर ह्या कार्यक्रमाचा निमित्ताने आपण अल्पोहार समाजातील साप्ताहिक वंदना घेणार्या प्रत्येक लोकांना देऊया ही संकल्पना मांडून या गोष्टी वर अंमलबजावणी करणे व आपल्या सहकुटुंब सहपरिवारासहित आपल्या लहान मुलासहित साप्ताहिक वंदना घेण्यासाठी पुढाकार घेऊन पती-पत्नीच्या हस्ते बुद्ध वंदना पुष्पहार अर्पण करतात संघटनेच्या माध्यमातून करत असलेल्या धार्मिक कामाबद्दल अगदी कमी दिवसांमध्ये जास्त प्रतिसाद भेटत आहे आणि यामध्ये ज्या पद्धतीने सर्व समाजातील लोकांनी दिलेल्या जबाबदारीला यशस्वीरित्या विश्वास संपादन करत आहे ते अध्यक्ष अमोल गायकवाड व संघटनेमधील सर्व पदाधिकारी ज्यांच्याकडून जे काही शक्य होत आहे ते प्रत्येक माणूस समाजातील प्रत्येक धार्मिक कामासाठी आपल्याला मदत करताना दिसत आहे समाजामध्ये लोकांना एक लागलेली उत्सुकता साप्ताहिक वंदना बद्दल हीच काम करणाऱ्या लोकांसाठी स्फुर्ती निर्माण होते




प्रत्येक भीम नगर मधील अगदी लहान बालकापासून ते वृद्ध लोकांपर्यंत धार्मिक गोष्टी पोहोचत आहे यातच आम्हाला समाधान आहे आम्ही निस्वार्थ भावनेने केलेल्या कार्याला कुठेतरी लोकांच्या केलेल्या कौतुकांच्या चार शब्दांने आम्ही करत असलेला कार्याबद्दल आम्हाला एक ऊर्जा निर्माण होते आणि समाजातील लहान मुलांना अगदी आपल्या समाजातील महिला वर्गांना सुद्धा एक साप्ताहिक वंदना बद्दल ज्या पद्धतीने आवड धम्माचा प्रसार प्रचार होत आहे ती खूप अभिमानाची गोष्ट आहे जे लोक आमच्या विरोधात जाऊन भीम नगर मधून शाखेच्या माध्यमातून एक वेगळा मेसेज पसरण्याचा प्रयत्न करत होते आज आमच्या सोबत बुद्ध वंदना घेत असताना उपस्थित राहतात कार्यक्रमाचा आल्पहोर चा खर्च मी करतो असं ठामपणे सांगतात त्यावेळेस आम्ही योग्य मार्गाने आहोत हे सिद्ध होतं आहे व तुम्ही सोबत असल्याने आम्हाला आगदी मनापासून आनंद होतोय सतत मनामध्ये एकच प्रश्न निर्माण होतो की समाजापेक्षा कोणीच मोठा नाही प्रत्येक व्यक्तीमध्ये समाज म्हणून बघा प्रत्येक व्यक्तीमध्ये एक सामाजिक सलोखा जपण्याची धडपड आहे हे बघून बघा प्रत्येक समाजामधील प्रत्येक लोकांनी जे खास करून शहिरी भागामध्ये राहतात त्यांनी प्रत्येकाने रविवारी बुद्ध विहारा कडे जाण्याची सवयी लावून घ्या आपल्या जवळ आसपास बुद्ध विहार नसेल तर घरामध्ये बुद्धाची मूर्ती बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा त्यांच्यासमोर बुद्ध वंदना त्रिशरण पंचशील ह्या सर्व गोष्टी सामूहिक प्रतिज्ञा बोलत चला जेणेकरून आपल्या लहान बालकांना आपल्या घरातील महिला वर्गांना धार्मिक संस्कार रुजवण्यासाठी मदत होतात असं होत असल्यामुळे आपल्या सोलापूर जिल्ह्यामधून आपल्या गावचे नाव तरी निघणारच पण आणि दुसरा फायदा म्हणजे आपण करत असलेल्या कार्याबद्दल आपली स्वतःची प्रगती सुद्धा होणार आणि आपण प्रत्येक जण जास्तीत जास्त पद्धतीने धार्मिक गोष्टीचा प्रसार आणि प्रचार करू आणि आपल्या सर्वांचे मतभेद बाजूला सारून प्रत्येक समाजातील व्यक्तीने एक समाज म्हणून एकमेकांचा आदर केला पाहिजे आपली जी काही मतभेद आहे ती बाजूला सरून धार्मिक गोष्टी चा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी एक समाज म्हणून सर्वांबरोबर येणे काळाची गरज आहे आणि आपण सर्वांनी साप्ताहिक वंदनेला उपस्थित दाखवला त्याबद्दल संघटनेच्या पदाधिकारी यांच्याकडून आपलं जेवढे कौतुक करावं तेवढं कमीच आहे या ठिकाणी आपल्या सर्वांचा जाहीर आभार व्यक्त करतो आपली उपस्थिती हाच धम्माचा प्रसार आणि प्रचार आहे......

तालुक्यातील सर्व बुद्धिजीवी आंबेडकरीवादी युवकांना , सामाजिक कार्यकर्त्यांना विनंती आहे आपल्या प्रत्येक गावात दर रविवारी साप्ताहिक सामूहिक बुद्ध वंदना घेऊन सामाजिक एकता निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे आठवड्यातून एक दिवस समाजासाठी हे उपक्रम राबवून समाजहितासाठी , सामाजिक चळवळ उभे करून आपले समाज बुद्धाच्या विचाराने कसे पुढे जाता येईल त्यासाठी प्रयत्न करावे यासाठीच आमच्या गावातील भीम नगर मध्ये आम्ही चालू केलेले उपक्रम अशा प्रकारे सर्व गावात चालू व्हावे हीच मापक अपेक्षा

जय भीम नमो बुद्धाय

**-अविनाश गायकवाड**

**काझीकणमुस ता. अक्कलकोट**

पान १ वरुन

### महिला आरक्षण लोकसभेत...

आणि सध्या उपस्थित असून मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश मतांसह हे विधेयक मंजूर केलं जात आहे.

लोकसभेत महिला आरक्षणाच्या विधेयकावर चर्चा झाल्यानंतर हे विधेयक मंजूर झाले आहे. विधेयकाच्या बाजूने ४५४ तर विरोधात फक्त दोन सदस्यांनी मतदान केले. महिला आरक्षण विधेयक हे घटनादुरुस्ती विधेयक आहे. महिला आरक्षण विधेयक आता राज्यसभेत सादर करण्यात येणार आहे. राज्यसभेच्या मंजुरीनंतर महिला आरक्षण विधेयक राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. त्यानंतर घटनादुरुस्ती होईल. महिला आरक्षण कायद्याची १९९६ पासून सुरू झालेली प्रतीक्षा आता संपण्याची शक्यता आहे. महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्यासाठी शेवटचा प्रयत्न २०१० मध्ये युपीए सरकारच्या काळात करण्यात आला. त्यावेळी हे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले. मात्र, लोकसभेत सादर करण्यात आले नाही. महिला आरक्षण कायदा लागू झाला तरी त्यांची अंमलबजावणी होण्यास किमान ८ ते १० वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याचे म्हटले जात आहे. आगामी काळात होणारी जनगणना आणि त्यानंतर होणारे मतदारसंघाची पुनर्रचनेत महिला आरक्षण लागू होणार आहे.

१९९६ नंतर महिला आरक्षण विधेयक अनेकदा संसदेच्या पटलावर मांडण्यात आले आणि प्रत्येक वेळी त्याला विरोधाचा सामना करावा लागला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या दोन वर्षापूर्वी म्हणजेच २०१७ मध्ये काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी याबाबत पंतप्रधान मोदींना पत्र लिहिले होते. महिला आरक्षण विधेयक २०१० मध्ये राज्यसभेत मंजूर होऊनही लोकसभेत मांडण्यात आलेले नाही. त्यामुळे हे विधेयक अद्यापही रखडले आहे.

**महिला आरक्षण विधेयकातले ठळक मुद्दे** ✻ या आरक्षणामुळे महिलांची संख्या लोकसभेत किमान १८१ होणार ✻ या आरक्षणात पोटआरक्षणही असणार आहे, ३३ टक्के पैकी काही जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वर्गाच्या महिलांसाठी आरक्षित असतील.✻ - हे विधेयक मंजूर झाल्यानंतरच्या पहिल्या जनगणनेच्या आधारे जी पुनर्रचना होईल तेव्हा हे आरक्षण लागू होईल. म्हणजे २०२४ च्या निवडणुकीला हे आरक्षण लागू होणार नाही हे जवळपास स्पष्ट आहे. ✻ हे आरक्षण १५ वर्षांसाठी असेल असं विधेयकात म्हटलं आहे. पण एस सी, एस टी आरक्षणाप्रमाणे हे आरक्षणही नंतर वाढत राहू शकतं.

**महिला आरक्षणाचा प्रवास** ✻ १९९१ मध्ये महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण लागू झालं. ✻ १९९६ मध्ये संयुक्त मोर्चा सरकारच्या काळात महिला आरक्षण विधेयक लोकसभा, विधानसभेतही लागू करण्याचा पहिला प्रयत्न. ✻ त्यानंतर वाजपेयींच्या काळातही हे विधेयक आणण्याचा प्रयत्न, मात्र संख्याबळ अपुरं. ✻ २०१० मध्ये यूपीए सरकारच्या काळात हे विधेयक राज्यसभेत मंजूर, पण लोकसभेत संख्याबळ नसल्यानं तिथे मंजूर होऊ शकलं नव्हतं.

### राज्यातील सर्व दिव्यांगासाठी ..

ओमप्रकाश (बच्चू) कडू यांनी केले.

येथील कर्मयोगी आप्पासाहेब काडादी सांस्कृतिक सभागृह येथे आयोजित दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी अभियान अंतर्गत आयोजित कार्यक्रमात श्री. बच्चू कडू मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार सुभाष देशमुख, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, दिव्यांग कल्याण आयुक्त विष्णुदास घोडके, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, प्रहार संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्ष संजीवनी बारगुडे यांच्यासह दत्ता चौगुले, नितीन माने, आभूताई भोजने, झविर शेख आदी उपस्थित होते.

दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष श्री कडू पुढे म्हणाले की, दिव्यांग कल्याण विभागाची स्थापना झाल्यापासून राज्यातील सर्व जिल्ह्यात दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी हे अभियान राबवले जात आहे. या अंतर्गत शासनाच्या विविध शासकीय योजनांचा लाभ दिव्यांग बांधवांना मिळवून दिला जात आहे. तसेच या अभियानात दिव्यांग नागरिकांच्या विविध तक्रारी ऐकून घेऊन त्यावर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश दिले जात आहेत. या माध्यमातून हजारो लाखो दिव्यांगांना शासनाच्या योजनेचे प्रत्यक्ष लाभ मिळत आहेत. एक ही पात्र दिव्यांग व्यक्ती लाभापासून वंचित राहणार नाही यासाठी शासन व प्रशासनाच्या वतीने खबरदारी घेतली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. दिव्यांगासाठी स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय असावे यासाठी मागील पंधरा वीस वर्षापासून लढा दिला जात होता, त्याला यश येऊन ३ डिसेंबर २०२२ पासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष प्रयत्नातून हे दिव्यांग मंत्रालय स्थापन झालेले आहे. तेव्हापासून हा विभाग दिव्यांगांच्या कल्याणासाठी कृतीशील पणे काम करत असून प्रशासनाकडून ही तेवढेच सहकार्य मिळत आहे. आज या ठिकाणी सोलापूर जिल्हा प्रशासनाने दिव्यांगाची अत्यंत चांगली सोय केलेली आहे व मागील वर्षभरात प्रशासन दिव्यांगासाठी उत्कृष्टपणे कार्य करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. दिव्यांगाप्रती अशीच संवेदना ठेवून सकारात्मक काम करावे व सोलापूर जिल्हा दिव्यांगाच्या योजना राबवण्यात राज्यात प्रथम क्रमांकावर असावा असे आवाहनही त्यांनी प्रशासनाला केले.

पुरवठा विभागाकडे पाच ते सहा टक्के अन्नधान्य शिल्लक राहत असून जिल्हाधिकारी यांनी त्याचा आढावा घेऊन शिल्लक राहिलेले स्वस्त धान्य दिव्यांगाना वाटप करण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच जिल्ह्यातील अपंगांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात शक्ती केंद्र निर्माण करावीत व १००% अपंगत्वाचे प्रमाणपत्र वाटप करावीत. दिव्यांगाचे बचत गट स्थापन करून त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून द्यावा. दिव्यांगाने ही शासनाच्या पाच टक्के निधीवर अवलंबून न राहता शिक्षण प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे उद्योग व्यवसाय उभारणीसाठी पुढाकार घ्यावा, त्यासाठी शासन व प्रशासन मदत करेल, अशी माहिती श्री. कडू यांनी दिली.

शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी दिव्यांगाची सेवा ईश्वर सेवा म्हणून करावी. दिव्यांगाच्या सर्व अडचणी सोडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहावे असे आवाहन करून सोलापूर शहर व पंढरपूर शहरातील कोणताही दिव्यांग बांधव उपाशी राहत असेल तर त्याची माहिती द्यावी त्या बांधवाला घरपोच दोन वेळ जेवण लोकमंगल च्या वतीने उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती आमदार सुभाष देशमुख यांनी दिली. जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधवांना शिक्षण प्रशिक्षण देऊन तसेच विविध शासकीय योजनेचा लाभ देऊन मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. मागील वर्षी १६ हजार ८०० अपंगत्वाचे प्रमाणपत्र प्रशासनाच्या वतीने दिव्यांगाना घरपोच देण्यात आलेली आहेत अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी देऊन आज या ठिकाणी दिव्यांगाशी संबंधित २८ विभागाचे शासकीय योजनांवर आधारित माहितीपर स्टॉल लावण्यात आलेले आहेत त्या स्टॉलला भेट द्यावी असे आवाहन ही त्यांनी केले. जिल्हा परिषदेच्या वतीने ही प्रत्येक गावात प्रत्येक दिव्यांग कुटुंबापर्यंत पोहोचून त्या कुटुंबातील प्रत्येक दिव्यांगला शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिली.

प्रारंभी दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष ओमप्रकाश कडू यांच्या हस्ते दीप्रज्वलनाने अभियानाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने दिव्यांगासाठी असलेल्या योजनांची एकत्रित माहिती वर आधारित केलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन श्री कडू व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सेवानिवृत्त दिव्यांग शिक्षिका छाया उंब्रजकर आठवणीची साठवण या पुस्तिकेचेही प्रकाशन झाले. त्यानंतर श्री कडू यांच्या हस्ते अंध क्रिकेटपटू गंगा कदम हीस ५० हजाराचा धनादेश महापालिकेच्या वतीने देण्यात आला. अस्थिव्यंग क्रिकेटपटू मनोज धोत्रे, कळसुबाई शिखर पार केलेले दिव्यांग सोमनाथ घुले, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अस्थिव्यंग अबूताई भगत, वेल्डर दस्तगीर शेख, चित्रकार लक्ष्मी शिंदे, गायक शिवशरण गडतुटे, समाजसेवक प्रभाकर कदम यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सुमारे दहा हजार दिव्यांग बांधव उपस्थित होते. श्री. कडू यांनी प्रत्येक दिव्यांग व्यक्तीकडे जाऊन त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या व त्या तक्रारी संबंधित कार्याप्रमुखांनी तात्काळ सोडवण्याबाबत निर्देश दिले. दिव्यांगासाठी योजना राबवत असलेल्या २८ विभागांचे शासकीय योजनांचे माहितीपर स्टॉल कार्यक्रमाच्या ठिकाणी लावण्यात आले होते. या स्टॉलवर ही दिव्यांग व्यक्तींची गर्दी होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी केले तर आभार सच्चिदानंद बांगर यांनी मानले.

### प्रत्यक्ष कर संकलनात मोठी

समाविष्ट आहेत. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत जमा केल्या जाणाऱ्या अग्रिम कराच्या दुसऱ्या हप्त्यांच्या रूपात एकूण ३.५५ लाख कोटी रुपयांचे संकलन झाले आहे. जे मागील आर्थिक वर्षाच्या याच कालावधीतील २.९४ लाख कोटी रुपयांच्या संकलनाच्या तुलनेत २१ टक्के अधिक आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, २०२३-२४ मध्ये प्रत्यक्ष करांचे एकूण संकलन ९,८७,०६१ कोटी रुपये आहे. जे गेल्या वर्षी ८,३४,४६९ कोटी रुपये होते. अशा प्रकारे १८.२९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. दरम्यान, करचुकवेगिरी मोठ्या प्रमाणात होत होती. ते थांबवण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना हळूहळू यश मिळत आहे. कर संकलन प्रक्रियेत प्रगत तंत्रज्ञानाचा वापर यात उपयुक्त ठरत आहे.

### हा ओबीसी समाजाचा अपमान

असा प्रश्न मी विचारला. यावर मीच उत्तर देऊ इच्छितो, भारतातील ९० पैकी केवळ ३ सचिव ओबीसी समुदायाचे आहेत. हे ओबीसी सचिव भारताचा केवळ पाच टक्के अर्थसंकल्प नियंत्रित करतात. म्हणजे भारताचा अर्थसंकल्प ४४ लाख कोटींचा असेल तर केवळ २.४७ लाख कोटी म्हणजेच ५ टक्के अर्थसंकल्प यांच्या नियंत्रणात आहे. ही चर्चा भारतातील लोकांकडे सत्ता हस्तांतरित करण्याबाबत आहे. यामध्ये महिला एक घटक आहे आणि ओबीसी समुदाय हा दुसरा घटक आहे. देशात मोठ्या प्रमाणात ओबीसी समुदाय असूनही देशातील ९० सचिवांमध्ये केवळ ३ सचिव ओबीसी समुदायाचे आहेत. ते भारताच्या केवळ पाच टक्के अर्थसंकल्प नियंत्रित करतात. ही एक लाजिरवाणी बाब असून हा ओबीसी समुदायाचा अपमान आहे, अशा शब्दांत राहुल गांधींनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. या देशात किती टक्के ओबीसी समुदाय आहे? किती दलित आहेत? किती आदिवासी आहेत? या प्रश्नांची उत्तरं केवळ जातीय जनगणनेतूनच मिळू शकतात, याबाबतचा तपशील लवकरात लवकर जाहीर करावा, अशी मागणीही राहुल गांधींनी यावेळी केली.

### दहशतवाद्याच्या हत्येनं भारत

बाबतीत कॅनडा नवव्या स्थानावर आहे. दोन्ही देशांमध्ये शैक्षणिक, औद्यागिक अशा अनेक क्षेत्रांमध्ये कोट्यवधींचे करार आहेत. मोठ्या व्यापार भागीदारी असलेल्या देशांमधील राजनैतिक स्तरावर सुरू असलेल्या वादामुळे कॅनडामध्ये कार्यरत असलेल्या भारतीय कंपन्यांसाठी समस्या निर्माण होऊ शकतात आणि त्यांच्याकडून तिथे केलेल्या प्रचंड गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो. असे झाल्यास ही केवळ भारतीय कंपन्यांसाठीच नव्हे, तर कॅनडाच्या अर्थव्यवस्थेसाठीही चिंतेची बाब ठरेल, कारण या कंपन्यांमध्ये कॅनडातील हजारो लोक काम करतात.

कॅनडासाठी भारतीय कंपन्यांचं महत्त्व काय आहे आणि या कंपन्यांची तिथे किती मोठी गुंतवणूक आहे? यासंदर्भात याच वर्षी मे २०२३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालात आकडेवारीसह सविस्तर माहिती देण्यात आली होती. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री नं 'फ्रॉम इंडिया टू कॅनडा : इकॉनॉमिक इम्पॅक्ट अँड एंगेजमेंट' या शीर्षकाचा अहवाल प्रसिद्ध केला होता. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल टोरोंटो दौऱ्यावर असतानाच हा अहवाल जाहीर करण्यात आला होता.




# अक्कलकोट तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा संभाजी ब्रिगेड ची सरकारकडे मागणी

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावे अशी मागणी संभाजी ब्रिगेड ने केली आहे आज सोमवारी येथे तहसीलदार बाळासाहेब शिरसट यांना या मागणी चे निवेदन संभाजी ब्रिगेड च्या शिष्टमंडळाने दिले.


अक्कलकोट तालुक्यात गेल्या चार महिन्यात जरा ही पाऊस पडला नसून पेरण्या झाल्या नाहीत, त्यामुळे शेतकरी जनावरे आणि गोरगरीब जनता मजूर कामगार संकटात सापडले आहेत, पुढे ही पाऊस पडेल की नाही याची शास्वती राहिली नाही त्यामुळे अक्कलकोट तालुक्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात यावे अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष दयानंद काका काजळे, अक्कलकोट तालुकाध्यक्ष, मनोज भाऊ गंगणे, अक्कलकोट शहराध्यक्ष सुरेश काका कदम, मार्गदर्शक तम्मा मामा शेळके, शेतकरी शिवाजी माने, विजयकुमार पाटील, संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पुन्हा पावसाचा अंदाज कसा चुकत आहे? फिल गुड चे वातावरण सरकार कशासाठी तयार करत आहे




सोलापूर/महेश गायकवाडः गेल्या चार महिन्यापासूनपाऊस पडत नसल्याने खरीप हंगाम वाया गेला आहे, त्यामुळे शेतकरी च नाही तर जनता देखील हवालदिल झाली आहे कारण पिण्यासाठी देखील पुढे पाणी मिळणार की नाही अशी गंभीर परिस्थिती सद्या पाऊस पडत नसल्यामुळे निर्माण झाली आहे, सद्या राज्यातील ८० टक्के धरण तलाव आणि छोटे मोठे तलाव पाणी साठा न झाल्यामुळे कोरडे पडले आहेत.

आता रब्बी हंगाम आला तरी पाऊस पडण्याचे नाव घेईना पाऊस लांबल्याने विहीर, बोअरचे पाणी कमी झाल्याने फळबागा बागा जळू लागल्या आहेत, पुन्हा पुन्हा पावसाचा अंदाज वर्तविला जात आहे, परंतु हा अंदाज कसा चुकत आहे,हे मोठे कोडेच बनले आहे. पाऊस गायब झाल्यामुळे शेतकरी व जनता हवालदिल झाली असून ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये प्रचंड भिती निर्माण झाली आहे,पुन्हा पुन्हा पाऊसाचा अंदाज कसा चुकतोय ??असा महत्वपूर्ण प्रश्न निर्माण झाला आहे, गेल्या तीन दिवसांपासुन राज्यात अति मुसळधार पाऊसाचे अंदाज वर्तविण्यात येत होते मात्र अगदी एक मि.मि देखील पाऊस झाला नाही. राज्यातील अनेक जिल्ह्यात तर अगदी रेड अलर्ट देखील देण्यात आला होता. परवा हवामान विभागाच्या मुख्य कार्यलयात जाऊन या बद्दल विचारणा देखील केली ,अतिरिक्त महासंचालकांनी देखील मुसळधार पाऊस पडणारच असे अगदी खात्रीने सांगितले आहे, मात्र तरीही पाऊस गायब झालेला दिसत आहे. नक्कीच कुठे तरी गडबड आहे , जाणीवपुर्वक शेतक-यांना खोटच्या आशेला ताटकळत ठेवले जात आहे का ? असा संशय आता येत आहे. फील गुड चे वातावरण ठेवत दिवस काढायचे सरकारने धोरण स्विकारले असावे ??? असे दिसत आहे दुष्काळ घोषित करण्यास विलंब का लावला जात आहे याचा जाब सरकारला कोण विचारणार ??? खोटे आकडेवारी दर्शवून दुष्काळ गायब करून पीक विमा नुकसान भरपाई नाकारण्यात येणार का ?? विरोधी पक्ष सुद्धा या विषयी आक्रमक मागणी न करता जवळपास मूग गिळून गप्प आहे हे धक्कादायक आहे ... की खाजगी विमा कंपन्यांच्या दबावाचे अर्थकारण दडले आहे ?? पावसाळा सुरू होऊन सुमारे साडेतीन महिने झाले आहेत. एकाही नक्षत्रात दमदार पाऊस पडला नाही. आता भरवशाची म्हणलं तर उत्तरा व हस्त ही दोन नक्षत्र राहिली आहेत. सध्या उत्तरा नक्षत्र सुरू आहे. पाऊस नसल्याने विहिरींची व बोअरची पाणी पातळी खालावली आहे. भरीस भर म्हणून उन्हाळ्यासारखे कडक ऊन पडू लागले आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात होत आहे.काही शेतकऱ्यांनी ऊसाला ठिबक सिंचन केले आहे तर काहींनी नाही. पाणीच नसल्याने उसाची म्हणावी तशी भूक भागेना झाली आहे. पाऊस नसल्याने अगोदरच उसाच्या वजनात मोठी घट झाली आहे,या संकटामुळे वजनात जास्तच पुन्हा जास्तच घट होणार आहे. उसाच्या सऱ्या कोरड्या असल्याने हुमणी सह उंदीर, घुशी, साप यांना पोषक वातावरण तयार झाले आहे.हुमणीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी कुठलीच उपाययोजना शेतकऱ्यांना करता येईना. पाऊस पडायला तयार नसल्यामुळे पांडे येथील नाना काळे या शेतकऱ्याने सीताफळ व लिंबोणीची बागेतील झाडे उपटून काढली आहेत. लांबलेला पाऊस आणि कमी झालेले पाणी पातळी यामुळे लिंबू बाग सांभाळणे कठीण झाले आहे. काळे यांच्याकडे एक एकर सीताफळ व दोन एकर लिंबोणीची बाग होती. त्यांच्याकडे तीन बोअर व एक विहिरी आहे. पाणी कमी झाल्याने ठिबक सिंचन केले. बाग पाण्याअभावी जळू लागल्याने फळाला लागताच पाणी कमी पडले.त्यामुळे त्यांनी अख्खी बाग च उध्वस्त करून टाकली आहे,

## आदर्श पुरस्कार मिळाल्याने लिपिक आरेनवरु यांच्या रिपाइं कडून सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील शिवचलेश्वर प्रशालेतील मुख्य लिपिक वसंत आरेनवरु यांना आदर्श लिपिक पुरस्कार मिळाल्याने रिपाइं (आठवले गट)च्या वतीने जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी यांच्या हस्ते सत्कार करुन गौरविण्यात आली आहे.

मौजे मैंदर्गी येथे वसंत आरेनवरु सर यांनी शिवचलेश्वर हायस्कूल येथे वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असून अनुभवी आणी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे.त्यांचा हा सत्कार रिपाइं(आठवले गट)च्या वतिने गौरविण्यात आली आहे. याप्रसंगी मानवाधिकार न्याय सुरक्षा संघटनेचा तालुका अध्यक्ष मक्तुम लुकडे,रिपाइं जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी,युवक आघाडीचे तालुका कार्याध्यक्ष विजयकुमार पोतेनवरु,मुआ तालुका उपाध्यक्ष इस्माईल आळंद,दुधनी रिपाइं शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,मुस्लिम आघाडी दुधनी शहर अध्यक्ष महेदिमिंया जिडगे, आंदेवाडी(जं)चे सरपंच रमेश धोडमनी,ज्येष्ठ नागरिक मचिंद्र शिंगे आदि सह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व उपस्थित मान्यवरांनी वसंत आरेनवरु यांना पुरस्कार मिळाल्या बद्दल हार्दिक सुभेच्छा देण्यात आली आहे.शेवटी सरांनी सत्कार केल्या बद्दल आभार मानले.

## सीमा भागातील विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण केंद्रात प्रवेशित व्हावे : डॉ. बंडगर




जत/प्रतिनीधी : दुष्काळग्रस्त सीमा भागातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये याबद्दल शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र सदैव प्रयत्नशील आहे.त्यासाठी सीमा भागातील विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण केंद्रात प्रवेशित व्हावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील आंतरविद्याशाखेचे समन्वयक प्रा. डॉ. चांगदेव बंडगर यांनी केले.

तालुक्यातील जा.बोबलाद येथे शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, व श्री. गजानन आर्ट्स व सायन्स महाविद्यालय, जा. बोबलाद, श्री. आर. के. पाटील महाविद्यालय, संख व आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, उमदी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रवेश प्रक्रिया कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यशाळेस श्री. गजानन आर्ट्स व सायन्स महाविद्यालय, जा. बोबलादचे मा. प्राचार्य डॉ. आर. आय. इनामदार अध्यक्षस्थानी होते.

डॉ.बंडगर म्हणाले की, विदयार्थ्यांनी कौशल्यावर आधारित विविध सर्टिफिकेट कोर्सेस पूर्ण केल्यास रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या घटकांनी याचा लाभ घ्यावा. तसेच यावेळी सांगली विभागीय समन्वयक प्रा.डॉ.सुशांत माने म्हणाले की, जत, कवठेमहांकाळ व मिरज तालुक्यातील सीमा भागातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाची सुवर्णसंधी दूरशिक्षण केंद्र उपलब्ध करून देत आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी पदवीच नाही पदव्युत्तर शिक्षण तेही कौशल्यावर आधारित घेणे काळाची गरज बनली आहे. तसेच दूरशिक्षण अंतर्गत असणाऱ्या बी.ए., बी.कॉम.,एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. गणित व एम. बी. ए. या विविध अभ्यासक्रमां साठी विद्यार्थ्यांनी प्रवेशित व्हावे. तसेच सीमा भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी दुहेरी पदवीचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत सांगली विभागीय केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. सुशांत माने यांनी केले समन्वयक प्रा.डॉ.एम.आय. मेंडिगिरी, श्री.पी.एल. बुरूटे, तसेच मुख्याध्यापक प्रा.डी.एम.बगली विद्यार्थी व पालक उपस्थित होते. आभार प्रा. परमेश्वर के. खरात यांनी मांडले. सूत्रसंचालन श्रीमती मेहरे यांनी केले.

## राजेंद्र कोरके पाटील यांचा वाढदिवस साजरा



पंढरपूर/प्रतिनिधीः दैनिक यश सिध्दी न्युज पंढरपूर विभाग प्रमुख श्री राजेंद्र कोरके पाटील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला याप्रसंगी पंढरपूर शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष नागेश अदापुरे पत्रकार संघाचे मार्गदर्शक संपादक राजेश बादले पाटील सराफ संजय गायकवाड इंजिनीयर श्रीकांत शिंदे विनोद पोतदार इत्यादी सह पत्रकार उपस्थित होते

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त नळदुर्ग येथे भरगच्च कार्यक्रम

### विद्यार्थांच्या प्रभात फेरी द्वारे मराठवाडा मुक्ती संग्रामाची जनजागृती

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथे अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत.त्यामधील एक घटना म्हणजे नळदुर्ग शहरातील मराठवाडा मुक्तीसंग्रामासाठी दिलेला लढा होय.दि.१७ सप्टेंबर १९४८ रोजी या लढ्याला यश मिळाले त्यामुळे दि.१७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. या ऐतिहासिक दिनाला आज ७५ वर्षे पूर्ण होत आहेत.

या अमृत मोहत्सवी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून नळदुर्ग येते विविध ठिकाणी भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शालेय विद्यार्थ्यांची नळदुर्ग शहरात भव्य प्रभात फेरी काढून मराठवाडा मुक्ती संग्राम दिना विषयी जनजागृती करण्यात आली.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद निजाम संस्थान हे स्वातंत्र्यामध्ये विलीन होण्यास तयार नव्हते. या हैद्राबाद निजाम संस्थानात मराठवाडयातील सात ही जिल्हे सामाविष्ट होते. निजाम संस्थानात असलेले मराठवाड्यातील सात जिल्हे बाहेर काढून



भारत देशाच्या स्वातंत्र्यात विलीनीकरण करण्या करिता झालेला लढा म्हणजे हैदराबाद मुक्तिसंग्राम होय. या संग्रामात अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली तर कोणी या स्वातंत्र्याच्या लढाई मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून जीव मुठीत धरून रजाकारा विरुद्ध जिद्दीने लढा देवून ही लढाई जिंकली.

हा इतिहास जिवंत ठेवावा व नळदुर्ग शहराचे ऐतिहासिक महत्त्व कळावे म्हणून माजी नगरसेवक विनायक अहंकारी व भिमाशंकर बताले यानी गेली १ महिनाभर नळदुर्ग हुतात्मा स्मारक मध्ये दररोज विविध राजकीय शासकीय सामाजिक धार्मिक क्षेत्रातील नामावंत नागरीकाना बोलावुन घेऊन हुतात्म्यांना अभिवादन करण्याचा उपक्रम राबविला.त्याच बरोबर देशाचे संरक्षण करण्यासाठी शहीद झालेले किर्ती विर यशवंत बनसोडे यांच्या मातोश्री शांताबाई बनसोडे आणी स्वतंत्र्य सैनिकांचे वारसदार आदिंचा खुप मोठ्या प्रमाणात सत्कार करण्यात आला .

यावेळी नळदुर्ग ऐतिहासिक किल्यावर नायब तहसिलदार यांच्या हस्ते राष्ट्रीय तिरंगा ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी नळदुर्ग पोलीस ठाण्यातचे पोलीस उप निरीक्षक रियाज पटेल व त्यांच्या सहकार्यानी तिरंगा ध्वजास मानवंदना दिली.

तसेच येथील बोरीनदीवर सोलापूर ते हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या ऐतिहासिक आलियाबाद पुलाचे पूजन ही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या ठिकाणी शहिद झालेले बचित्तरसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून आभिवादन करण्यात आले. येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ,सर्व शाळा,नगर परिषद कार्यालयात, नळदुर्ग पोलीस ठाणे आदी ठिकाणी ही मराठवाडा मुक्ती संग्रामदिना निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उस्मानाबाद चे जिल्हाधिकारी डॉ सचिन ओम्बासे यानी जे स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यांच्या घरावर डिजीटल बोर्ड लाऊन त्यांचा इतिहास जिवंत ठेवण्याचा आणी त्यांचा सन्मान करण्यारा फलक तयार करून दिला आणी तो बोर्ड प्रत्येकांच्या घरावरती लावण्यात आला. यावेळी नळदुर्ग नगरीचे माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे नय्यर जाहागीरदार , बसवराज धरणे, कमलाकर चव्हाण , पत्रकार विलास येडगे , सुहास येडगे , सुधिर हजारे , हुतात्मा पुत्र देवानंद बनसोडे , नितीन कासार , संजय बताले , शिवाजीराव मोरे , अमर भाळे , संजय जाधव , उत्तम बनजगोळे , मंडल अधिकारी जयंत गायकवाड सह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## उपजिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांचे निधन



पंढरपूर : अभ्यासू वृत्ती, धाडसी निर्णय, उत्तम प्रशासक, ओतप्रत आत्मीयता, प्रेमळ व मृदू स्वभाव, निष्ठावंत अशा विविध गुणांनी त्यांनी आपली प्रशासकीय क्षेत्रात ओळख निर्माण केली होती. कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर या पदावर कार्यरत असताना, श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवासाचे बांधकाम वेळेत पूर्ण करण्यासाठी केलेले प्रयत्न, सेवाधारी ओवरीचे नूतनीकरण, बुंदी लाडू प्रसादाची आऊटसोर्सिंग पद्धतीने खरेदी, प्रदक्षिणामार्ग व चंद्रभागा नदीपात्र मंदिर समितीमार्फत साफसफाई करणे, कर्मचारी सेवा विनियम २०१५ व इतर अनुषंगिक असे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.प्रशासकीय क्षेत्रातील अनेक पदे त्यांना मिळाली. त्या प्रत्येक पदाची उंची वाढवण्याचे काम सरांनी केले. नवे घडवण्याची जिद्द, कल्पकता आणि दूरदृष्टीच्या जोरावर त्यांनी प्रशासकीय क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते.

## नाविंदगीच्या श्री प्रभुलिंग गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी गिरमल शिवरू तावरू उपाध्यक्षपदी लोकप्पा हाळतोट यांची निवड



अक्कलकोट /प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील नाविदगी येथील श्री प्रभुलिंगेश्वर गणेश उत्सव तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी गिरमल शिवरू तावरू यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. गणेशोत्सव निमित्त पदाधिकारी निवडण्यासाठी आज सोमवारी भिमा म गौडगांव, मल्लिनाथ चं हाळतोट, प्रभुलिंग श्री हाळतोट, सोमशेखर सि कस्तुरे , मल्लिनाथ चं कस्तुरे, गुरु हाळतोट तसेच सर्व मित्र मंडळ उपस्थित होते,वरील सर्व उपस्थित मान्यवरांच्या सहमतीने गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्ष पदी गिरमल शिवरु तारु यांची तर उपअध्यक्षपदी लोकप्पा चंद्रकांत हाळतोट यांची निवड करण्यात आली.

## शाडू मातीचा गणेश मूर्ती बनविण्याच्या कार्यशाळा संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधीः मैंदर्गी नगर परिषदेने समस्त मैंदर्गी पंचक्रोशीत यंदाचा गणेश उत्सव हा पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी पुढाकार घेतला असून, याचाच एक भाग म्हणून माझी वसुंधरा अभियान ४.० अभियाना अंतर्गत शाडू मातीचा गणेश मूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन केले.

विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाचा नारा दिल्याची माहिती मुख्याधिकारी अतिश वाळुंज यांनी दिली.

गणेशप्रेमी नागरिकांनी पर्यावरण पूरक अशा शाडू मातीच्या मूर्ती विकत घ्याव्यात किंवा घरच्या घरी बनवून पर्यावरण संवर्धनात योगदान देण्याचा प्रयत्न करावा, यासाठी मैंदर्गी नगर परिषद आणि जिल्हा परिषद कन्नड शाळा मैंदर्गी यांच्या संयुक्त विद्यमाने शाडू मातीच्या गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळे दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले. कार्यशाळेत जिल्हा परिषद कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांनी, शिक्षकवृंदांनी, नगरपरिषद अधिकारी, कर्मचारीवर्गाने मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. या कार्यशाळेसाठी कल्याणी शिवलिंगप्पा पेडसंगी यांनी शाडू माती पासून मूर्ती बनविण्याची कला विद्यार्थ्यांना अवगत करून दिली.

पर्यावरणपूरक गणेश मूर्तीचा वापर, पर्यावरणपूरक सजावट, निर्माल्य संकलन करून खत निर्मिती इत्यादी बाबत जनजागृती करून सणांच्या काळात होणारे जलप्रदूषण कमी व्हावे, यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमात विद्यार्थी तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात आपला सहभाग नोंदवून पर्यावरण पूरक गणेश उत्सवाचा संकल्प करावा.- **अतिश वाळुंज, मुख्याधिकारी,मैंदर्गीनगरपरिषद**

## गोडबोले विद्यालयास आदर्श शाळा पुरस्कार प्रदान

सोलापूर/प्रतिनिधीः येथील स्वर्गीय दाजीकाका गोडबोले विद्यालयास सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाच्यावतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे शिक्षक आमदार प्रा. जयंत आसगावकर यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी माध्यमिकचे शिक्षणाधिकारी महारुद नाळे, उपशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, सुभाष माने, तानाजी माने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष सुभाष पाटील, सचिव अशोक पाटील, प्राचार्य संजय गेंगाणे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबर कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेस हा पुरस्कार मिळाला आहे. यावेळी श्रीकांत पाटील, माजी मुख्याध्यापक रंगसिद्ध दसाडे, शशिकांत बारगजे, ओमप्रकाश यल्लटीकर उपस्थित होते.

